सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक

## सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे

## सार्वजनिक बांधकाम विभाग, नंदुरबार

## नाबार्ड योजने अंतर्गत यशस्वी विकास कामे

## नंदुरबार तालुक्यातील अमरावती नदीवरील पुल

## विकासाचा मजबूत दुवा

# -: कामाचा तपशिल :-




| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | प्रजिमा-५२ किमी. १२/८५० तलवाडे गावाजवळ मोठ्या पुलाचे बांधकाम करणे. ता. जि. नंदुरबार |
| २ | लेखाशिर्ष | नाबार्ड- २८ |
| ३ | प्रशासकीय मान्यता | दि. २३/०३/२०२३ रोजी रु. २६१.७८ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. |
| ४ | तांत्रिक मान्यता | दि. ०२/०८/२०२३ अन्वये रु. २१३.३२ लक्ष इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे. |
| ५ | कामाचा वाव | १०.०० मी. चे ५ गाळे, उंची ४.५० मी. |
| ६ | निविदा क्रमांक व कार्यारंभ आदेश दिनांक | B-१/SE-३४/२०२३-२४ दि. २५/०१/२०२४ |
| ७ | कामाची सद्यस्थिती | काम पुर्ण. दि. २५/१०/२०२४ |

# -: प्रकल्पाची पार्श्वभूमी :-

- नंदुरबार जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यातील रनाळे आसाणे सैताणे तलवाडे बु. रस्ता हा प्रजिमा दर्जाचा असुन त्याचा क्रमांक ५२ आहे. सदर रस्ता हा रामा-७ पासुन रनाळे आसाणे सैताणे तलवाडे बु. ते प्रजिमा-१७ ला मिळतो.
- सदर रस्ता हा बिगर आदिवासी व ग्रामीण भागातुन जातो. या रस्त्यावर साखळी क्रमांक १२/८५० मध्ये अमरावती नदी असुन सुरुवातीस सदर नदीवर जुनी तळफरशी होती. ही तळ फरशी पावसाच्या पुराने पाण्याखाली येत असल्याने वेळोवेळी व अनेकदा वाहतूक बंद पडत होती.
- सदर रस्ता हा स्थानिक रहिवासी, शाळकरी विद्यार्थी व वयोवृद्ध नागरिकांच्या तसेच वैद्यकीय वापरासाठी महत्वाचा रस्ता आहे.
- सदरील रस्ता हा रामा-७ व प्रजिमा-१७ ला जोडणारा महत्वाचा दुवा आहे.

# -: कामाचे छायाचित्र :-

## Before




## After



# -: परिणाम व लाभ :-

- सदर ठिकाणी मा.आमदार महोदय, स्थानिक जनता, लोकप्रतिनीधी यांच्या वारंवार मागणीवरुन नाबार्ड-२८ च्या RIDF (Rural Infrastructure Development Fund) योजनेंतर्गत सदर पुलाच्या बांधकामासाठी काम मंजुर करण्यात येऊन सद्यस्थितीत काम पुर्ण करण्यात आलेले आहे.
- या प्रकल्पामुळे स्थानिकांना जवळील बाजारपेठेस जाणे सोपे व सोयीस्कर झाले.
- स्थानिक शेतकरी यांना आपली माल वाहतूक करणे सुलभ झाले.
- सदरील रस्ता रामा-७ ला जोडला जात असल्याने जिल्ह्याच्या मुख्यालयी जाणे सोयीस्कर झाले आहे.
- परिसराच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती मिळाली.

# -: निष्कर्ष :-

- अमरावती नदीवरील पुल हा नाबार्ड च्या ग्रामीण विकास धोरणाचा उत्कृष्ट नमुना आहे.
- या पुलामुळे रनाळे, आसाणे, सैताणे, तलवाडे बु. या गावांची अंदाजे १३७१५ लोकसंख्येचा दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरुपी सुटलेला आहे.
- हा प्रकल्प इतर ग्रामीण भागांसाठी प्रेरणादायी ठरतो.



राष्ट्र की सेवा मे...

महाराष्ट्र PWD

सस्नेह धन्यवाद ...